
# प्रेमाचा गारवा



# प्रेमाचा गारवा

प्रा. नितीन दत्तात्रय दारमोड

ई साहित्य प्रतिष्ठान

# प्रेमाचा गारवा

## कवी : प्रा. नितीन दत्तात्रय दारमोड

ई - मेल : sanketshirsath13@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य. चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन :  ३१ ऑक्टोबर २०२०

©esahity Pratishthan®2020

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

***** प्रेमाचा गारवा *****

* अर्पण पत्रिका *

आपलेपणा जपून
मैत्रीची दोर टिकविणाऱ्या
सर्व मित्रांना समर्पित....!

* कवीचे मनोगत *



वयात आल्यावर एखाद्याच्या हृदयात प्रेमाचा नकळत पाझर फुटणे ही साहजिकच नैसर्गिक बाब आहे. तसं पाहिलं तर, प्रेम हे कधी कुणावर ठरवून केले जात नाही. आणि ठरवून केलेलं प्रेम हे चिरकाल टिकेलच असंही नाही. आयुष्याच्या वळणावरच्या वयातून वाटचाल करीत असताना कित्येक तरुण-तरुणी प्रेमाच्या सागरात सर्रास स्वतःला झोकून देतात. पण त्यावेळी नेमकं ते सागर हे अथांग, विशाल अन व्यापक असते हेच मुळात विसरलेले असतात. अन ज्यावेळी सागराची खोली मोजणे आवाक्याबाहेर होऊन जाते तेव्हा धडपड सुरू होते ती या प्रेम सागरातून बाहेर पडण्याची, स्वतःला सुरक्षित करण्याची... पण मित्रांनो निव्वळ वासनेच्या आहारी जाऊन कुणा एखाद्यावरती बसलेलं मन हे क्षणिक असून त्या शरीराबद्दल निर्माण झालेल आकर्षण म्हणजे शुद्ध प्रेम कदापि नव्हेच. न भेटता, न बोलता... फक्त हृदयाच्या स्पंदनावरुन चाहूल लागलेलं जाणवण म्हणजे प्रेमचं...

तसं पाहिलं तर, आमच्याकडे प्रेमवीरांच्या अनेक कथा सांगितले जातातच. तारुण्यपण जगत असतांना प्रत्येकानेच नक्कीच कुणा एकावर तरी निस्वार्थ प्रेम करावं आणि त्या प्रेमाची अनुभूती ही घ्यावीच. मर्यादित मानसिकतेच्या पलीकडे जाऊन प्रेमाचा खरा अर्थ जाणून घेतला तर नक्कीच त्या प्रेमाचा अर्थ आणि सार हा आयुष्यभर

पुरेल इतकी शिदोरी देऊनच जातो. तारुण्यपणाच्या उंबरठ्यावर असताना मलाही कविता लिहिण्याची आवड निर्माण झाली. ही आवड दिवसागणिक माझ्याशी अधिक जवळीकता साधून छंद कधी बनला हेही कळाले नाही. मिसरूडही न उगवलेल्या वयात शब्दबद्ध केलेल्या ह्या साऱ्या कविता भविष्यात कधीतरी प्रकाशित होतील ह्याचा तिळमात्र विचार कधी केला नव्हता. पण आज जाणत्या वयात त्या अजाणत्या वयात लिहिलेल्या कविता एकत्रित करुन त्या साऱ्या एका कवितासंग्रहाच्या माध्यमातून प्रकाशित करावे अशी मागील अनेक दिवसांपासून मनात चलबिचल चालू होती. या संदर्भात मनात चालू असलेल्या विचारांच्या घालमेलासंदर्भात आमचे मार्गदर्शक गुरू तथा प्रसिद्ध साहित्यिक श्री नागोराव सायन्ना येवतीकर सर (ना सा सर) यांच्याशी चर्चा केली. मी बोलून दाखविलेल्या माझ्या इच्छेला येवतीकर सरांनी क्षणार्धात होकार देऊन सर्वोतोपरी सहकार्य आणि मार्गदर्शन करण्याचे वचन दिले. आज माझा हा पहिलाच प्रयत्न असून या प्रयत्नाला सर्वप्रथम बळ देणारे व्यक्तिमत्व म्हणजे आदरणीय श्री नागोराव येवतीकर सर.

माझ्या सारख्या नवोदित कवीच्या ह्या प्रयत्नास आपणही सारे बळ द्याल, अशी अपेक्षा करतो.

- प्रा. नितीन दत्तात्रय दारमोड

* प्रस्तावना *

प्रेमाचा गारवा - ई-कविता संग्रह

--------------------------

कविता रसिक हो - नमस्कार

--------------------------------------------------

मराठवाड्यातील नांदेड येथे महाविद्यालयात अध्यापन करीत असलेले प्रा.नितीन दारमोड हे व्याख्याते म्हणून सर्वपरिचित आहेत. या प्रसिध्द व्यक्तिमत्वाचा - कवी म्हणून करून देण्याचा हा योग साहित्यिक व स्तंभ लेखक ,माझे मित्र श्री .नासा तथा नागोराव येवतीकरसर यांचे मुळे आला आहे.

येवतीकरसरांनी प्रा.नितीन दारमोड यांच्या इ-बुक -कविता संग्रह .."प्रेमाचा गारवा " ची प्रस्तावना मी लिहावी अशी सुचना -विनंती केली, त्यांचा मान राखून . संग्रहाचे हे प्रास्तविक करतो आहे..

मित्र हो -

प्रा.नितीन दारमोड यांचा ई-कविता संग्रहाचे शिर्षक - प्रेमाचा गारवा " असे आहे.

कविमनाला कवितेतून व्यक्त होण्याची असोशी असते , हीच असोशी या कवीला असणे अगदी स्वाभाविक आहे.

आपल्या मनाला एक निर्लेप आणि निर्मल असे समाधान देणारी भावना- म्हणजेच प्रेम ,"असे सोप्या शब्दात मी सांगेन.

या अडीच अक्षराची जादू माणसाच्या मनाला जगण्याची दिशा देते .

कवी नितीन दारमोड यांच्या इ- संग्रहात प्रेम-विषयक कविता तर आहेतच ,त्यांच्या काही कविता या जीवन विषयक आहेत..ज्यात कवी

जीवनाच्या विविध रंगावर व्यक्त होतो.

प्रेमविषयक विविध भाव-भावना या कवितांमधून वाचकांना दिसतील. प्रेमात पडल्याचा साक्ष्त्कार , प्रेम-भावनेचा स्पर्श मनाला होण्याचा क्षण , तिचा सहवास , तिच्या आठवणी , तिचा विरह ..असे भाव-तरंग या संग्रहातील कवितातून उमटले आहेत

हा कवी नवोदित आहे.. प्रस्तुतचे "प्रेमाचा गारवा " हे ई-बुक "त्याच्या या प्रवासाचा हा आरंभ आहे ,हे लक्षात घेतले की मग , त्याने कविता-लेखनाचे तंत्र अजून शिकायचे आहे .हे ही जाणवते अशा वेळी आपण या कवीला धीर देत समजावून सांगणे आपले काम आहे ,

ते म्हणजे लेखन -सराव आणि अभ्यास " या दोन्हीने कवीचा लेखन -अविष्कार

अधिक प्रभावी वाटेल असा होऊ शकेल

ही अपेक्षा कवी.नितीन दारमोडे यांच्या कवितेकडून पूर्ण होईल याची खात्री आहे.

प्रेमाचा गारवा " या ई-कविता संग्रहातील प्रेम कवितांची एक छोटी झलक

१.

"प्रेम म्हणजे काय हो
देवा कडून मिळालेली देणगी हो
उगाच म्हणत नाहीत "रेशीमबंध " ह्याला
सीमाच नसते त्या अतूट नात्याला ..

२.

प्रेमाचा गारवा - शीर्षक कविता

-----------------------------------------

प्रेमाचा तो गारवा
जणू मनी पाउस पडावा '
चिंब वाटेल आपल्या जीवा
म्हणून वाटतो सदा हवा हवा ..

------------------------------------------------

३. प्रेमात काय शक्ती असते ..हे अर्थातच प्रेमात पडलेल्या कवीला जाणवले ते या शब्दात आले आहे..

तिच्या प्रेमाने काय केल?

--------------------------------------

तिच्या प्रेमाने मला माणूस बनवलं
अन माणूस म्हणून भावना जपायला शिकवलं

----------------------------------------------------------

४. प्रेमाचा मौसम .

हा प्यार का मौसम ..कवीच्या मनाला काय वाटतो पहा ..
अजब मौसम

------------------------

या धुंद मौसमात
मस्तीत राहावे
जागे असून ही सर्व
स्वप्नीच पहावे

------------------------------------

नवोदित कवींचे कविता लेखन " वाचकांनी त्याला प्रोत्साहन देण्याच्या भूमिकेतून वाचले तर
लेखन - प्रतिभा अधिक उत्स्फुर्तपणे विकसित होण्यास मोठीच मदत होईल .
म्हणून .. उदार दृष्टीकोनातून नव्या कवींचे स्वागत करायला हवे आहे.असे या निमित्ताने सुचवावे वाटते.

कवी- प्रा.नितीन दारमोड यांच्या कविता लेखनाची नवीन वाटचाल नव्या जोमाने होत राहील ..
या प्रवासाठी त्यांना शुभेच्छा .

--------------------------

-अरुण वि.देशपांडे
बावधन-(बु)-पुणे.
9850177342

# * शुभेच्छा *

शुभेच्छा .....!

कविवर्य मंगेश पाडगावकरांची 'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं ! तुमचं आणी आमचं अगदी 'सेम' असतं ! ही कविता वाचल्यावर वाटतं की सर्वांच्या प्रेमाच्या कथा व कविता सारख्याच असतात. मात्र प्रा. नितीन दारमोड यांच्या प्रेमाच्या कविता अपवाद वाटतात. त्यांच्या कविता वाचल्यावर प्रेमाविषयी आदर वाढण्यास मदत मिळते. प्रेमाचा गारवा या कवितेत ते लिहितात

प्रेम म्हणजे असते काय हो?
मनातील भावनांचा पाऊस.. दुसरं काय हो |
प्रत्येकाने प्रेम करायचं असतं
भावनांच्या पावसात चिंब भिजायचं असतं ||

प्रेमाची व्याख्या म्हणजे प्रत्येकांच्या भावना असतात ते जपायला पाहिजे असा संदेश देतात. प्रत्येक कवितेतून त्यांनी प्रेमाला पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन व आयाम दिला आहे.

तारुण्याचा काळ हा स्वप्नासारखा असतो. प्रेम नावाच्या अडीच अक्षरांत प्रत्येक तरुण-तरुणी एवढं डुंबून जातात की, त्या दलदलीतून सहीसलामत बाहेर पडणे कित्येक जणांना जमत नाही.

महाविद्यालयात शिकत असतांना मनात नकळत प्रेमाचे धुमारे फुटायला लागतात. तरुण प्रेम या कवितेत त्यांचे मन देखील तसेच झाले आहे असे वाटते, ते लिहितात

काय करावं अन काय नाही
डोकं सरकतय क्षणोक्षणी |
जगण्यासाठी 'जीवन' नाही
अन मरण्यासाठी 'जीव' नाही ||

या वयात एकतर्फी प्रेमाचे जास्तीत जास्त प्रकार घडतात आणि त्यातूनच मग नको असलेल्या घटना पाहायला, ऐकायला आणि वाचायला मिळतात. पण प्रा. नितीन दारमोड यांच्या प्रेमाच्या कविता वाचतांना कवींचे एकतर्फी प्रेम दिसते पण जबरदस्ती कुठे दिसत नाही. ज्या वयात त्यांनी या रचना लिहिल्या, त्या वयाचा विचार केल्यास अशी निस्सीम प्रेमाची भावना निर्माण होणे खूप मोठी गोष्ट आहे. प्रा. नितीन ज्या परिवारात वाढले, ज्या परिसरात वावरले, ज्या शाळा-महाविद्यालयात शिक्षण घेतले, ज्या मित्रांची त्यांना सोबत लाभली आहे, त्या सर्व बाबीचा परिपाक म्हणजे त्यांचा हा पहिलावहिला कवितासंग्रह होय. भविष्यात त्यांची काव्यप्रतिभा भरपूर उजळू दे, त्यांच्या हातून साहित्याची अशीच अखंडित सेवा घडू दे, वाचकांना त्यांच्या विचारातील अनेक सुंदर काव्यरचना वाचण्यास मिळू दे अशी विद्येची माता सरस्वती हिच्या चरणी प्रार्थना करतो आणि काव्यसंग्रहाला मनस्वी शुभेच्छा देतो.

प्रा. नितीन साठी ह्या चार ओळी व्यक्त करतो...

जिंदगी बहुत कुछ सिखाती है।
कभी हँसाती है तो कभी रुलाती है।
पर जो हर हाल में खुश रहते हैं।
जिंदगी उन्ही के आगे सर झुकाती है।

- नासा येवतीकर, स्तंभलेखक तथा विषय शिक्षक, कन्या शाळा धर्माबाद, 9423625769

# * शुभेच्छा *

2005 के बाद आए नए कवियो में प्रा. नितीन दारमोड का प्रवेश हुआ है | "प्रेम का कारवा" यह उनका पहिला काव्यसंग्रह है | कम उमर के होनहार प्रतिभाशाली कवि के रुप में उनकी कीर्ती रोशन हैं | अपनी काव्यरचना द्वारा उन्होने आज के युवाओ को प्रेम की सही दिशा दिखाने का प्रयास किया है |

वैसे तो प्रेम हर व्यक्ती के जीवन संघर्ष का अभिन्न अंग है | 'प्रेम' इस ढाई अक्षर को समझने का प्रयास कवि ने किया है | उनके काव्य में प्रियसी के विरह का दुःख, प्रियसी के नखरे, एकतर्फी प्यार के दुष्परिणाम, प्रेम का व्यापार, प्रेम का सौंदर्य और प्यार की खट्टी-मिट्टी यादो का चित्रण हुआ है |

प्रा. नितीन दारमोड सामाजिक और राजकीय क्षेत्र में अग्रेसर है | साहित्यिक क्षेत्र में भी उनका यह प्रयास उज्वल भविष्य की चिंगारी है | आशा करता हूं, कवि ऐसा ही साहित्य लिखते रहे | उनके काव्यसंग्रह को बहुत-बहुत बधाई देता हूं....|

उनके लिए कहना चाहुंगा.....

" जो सफर की शुरुआत करते है,
वो मंजिल को पार करते है |
एक बार चलने का हौसला तो रखो,
मुसाफिरों का तो रस्ते भी इंतजार करते है |"

- प्रा.संजय मारोतराव देशमुख
जिल्हा उपाध्यक्ष, हिंदी अध्यापक संघ, नांदेड

* अनुक्रमणिका *


1. प्रेम
2. तरुण प्रेम
3. ती
4. स्पर्श
5. मावळता पाऊस
6. प्रेमाचा व्यवहार
7. प्रेमफूल
8. प्रेमाचा गारवा
9. प्रेम विरह
10. तिच्या प्रेमानं काय केलं?
11. बंद आठवणी
12. प्रेम शब्द
13. प्रेमाचा निराळा खेळ
14. जीवनफूल
15. प्रेमऋतू
16. अजब मौसम
17. हृदय तुझे
18. साज प्रेमाचा
19. तू इतकं काय केलंस?
20. कसं विसरु गं तुला?
21. फक्त तुझाच
22. तुझ्याच करिता

23. आठवण
24. मरण हवंय तुझ्यासंगे
25. नको ना विसरु
26. तुला काय वाटलं?
27. परतशील का कधी?
28. तिचाच जीव
29. कवी मित्रासोबत काव्यमय संभाषण
30. कवितेरुपी कविता
31. जीवनाची कविता
32. जीवनाचा अर्थ

## 1. * प्रेम *

'प्रेम' म्हणजे काय हो
देवाकडून मिळालेली 'देणगी' हो |
उगाच म्हणत नाहीत 'रेशमी बंध' ह्याला
सीमाच नसते त्या अतूट नात्याला ||
'प्रेम' हे निव्वळ पाण्यासारखे हो
पिईल त्याला 'तृप्ती' मिळेल हो |
दुनियेतील अख्खी हीच 'अदभुत' शक्ती
विश्वापेक्षाही अशी खूप मोठी 'व्याप्ती' ||
'जय हो' म्हणतात प्रेमात हो
'शॉर्टकट' नाही कुठलाच हो |
प्रेमात तुम्ही 'दिलदार व्हा' हो
प्रेमानेच 'प्रेम' जिंकूया हो ||

-------------------------------------

## 2. * तरुण प्रेम *

तरुणपणात जाताच
आला माझ्याही मनात विचार |
की आपण देखील पाहावं
करुन तरुण प्रेमाचा सत्कार ||
विचार भरपूर करुनी
निर्णय घेतला एकच मनी |
प्रेम करावं तरी कुणावरी
स्वतः वरी का लावण्यरूपी तरुणीवरी ||
शेवटी विश्वास टाकुनी तरुणीवर
ओढवून घेतला प्रेमरोग जीवावर |
सुचत नाही आता या वेड्या मनाला
मिळतच नाही कोणता उपचार या आजाराला ||
काय करावं अन काय नाही
डोकं सरकतय क्षणोक्षणी |
जगण्यासाठी 'जीवन' नाही
अन मरण्यासाठी 'जीव' नाही ||
-------------------------------------

## 3. * ती *

तू नसलीस की मन उदास होतं
तू दिसलीस की जीव बेवारस सुटत |
कशी घालू लगाम या बेभाम मनाला
तुझ्या आठवणींशिवाय चैन नाही जीवाला ||
सौंदर्य तुझे ते पाहुनी
डोळे दिपले एका क्षणी |
विचार आला मनोमनी
हीच का ती माझी स्वप्नराणी ||
मनाला विचार पटता पटेना
आठवणींतून चेहरा जाता जाईना |
शेवटी समजावलं,'थांब रे वेड्या मना'
एवढा विचार आत्ताच नको ना?
विचार करता करता विचारच गेला
अन कळलं तेव्हा या बेधुंद मनाला |
तू तिचा अन ती दुसऱ्याची
शेवटी 'त्याग' हीच निशाणी प्रेमाची ||

-------------------------------------------

## 4. * स्पर्श *

तिच्या मनातील चांदणे
मला का नाही उमजले?
माझ्या मनातील स्वप्ने
का नाही तिला समजले?
तिच्या त्या चमकत्या चांदण्याना
स्पर्श माझा कधी झाला?
तिच्या त्या अबोल चांदण्याना
भेटायला माझा चंद्रही निघाला ||
तिचे ते गोजिरवाणे रुप पाहुनी
झळकली 'मेनका' माझ्या मनी |
काय करु अन कुठून सुरुवात
हेच उत्तर सापडेना विचार करुनी ||
-----------------------------------------

## 5. * मावळता पाऊस *

थांबलेला पाहुनी पाऊस
झाले मन माझे नीरस |
काय सांगू काय कुणास
घालमेल होतोय जीवास ||
कालिदासांचा 'मेघदूत' आठवला
विचार माझ्याही मनात आला |
कुणीतरी असावा 'दूत' आपुला
विचारांची रवानगी करायला ||
पण विचार होते ते कशाचे
माझ्या या हृदय स्पंदनांचे |
गंध नाही घेतला कुणी त्याचा
मनात दबलेल्या त्या भावनांचा ||
मावळता तो पाऊस पाहूनी
विचार चमकला माझ्या ध्यानी |
मी काय अन तो पाऊस काय
पाहणारा आम्हांला आता उरलंय तरी कुणी?
----------------------------------

## 6. * प्रेमाचा व्यवहार *

तिचे ते निरागस प्रेम
पुन्हा कधीच नाही मिळणार |
तिच्या त्या स्वप्न चांदण्या
पुन्हा कधीच नाही कमावणार ||
तिच्या त्या गोड चेहऱ्यात
मी स्वतःलाच विसरलो |
पण तिच्या गोड हास्यात
मी कधीच नाही सामावलो ||
भरपूर दिलं तिने प्रेम हो
पण मलाच नाही उमजल |
स्वतःच्याच प्रेमाच्या वाटेवर
त्यागच त्याग मी पचवलं ||
केलं भरपूर काही प्रेमासाठी
चूक केली ती फक्त नाही दाखविण्याची |
माझं प्रेम फक्त मलाच मिळणार
हाच विचार सदैव मनात बाळगल्याची ||
शेवटी प्रेमानेच दिला प्रेमाला त्याग
वास्तव घडले हे माझ्या जीवनात |
म्हणे दिले तिला फक्त पैसा अन राग
खरंच कुठे मिळते का हो प्रेम विकत प्रत्यक्षात?

## 7. * प्रेमफूल *

तिचे ते गोड हसणे
जणू माझ्या काळजाचे सोने |
तिचे ते शांत बसणे
जणू माझे प्रेमफूल उमलणे ||
तिचा तो सदा मनमोकळेपणा
आवडे माझ्या वेड्या मना |
तिचा तो हसरा चेहरा
माझ्या हृदयातील पावसाच्या गारा ||
तिचे ते मासुम डोळे
बघता क्षणी प्रीत उकळे |
तिचे ते हळूच हसणे
जणू तारुण्य सुलभ लाजणे ||
तिने सोसलेल्या त्या वेदना
माझ्या मनातील गुलाबी भावना |
तिच्या हृदयातील त्या स्पंदना
गारवा देई नकळत या मना ||
तिचे ते निस्वार्थ प्रेम
देई मला स्वप्नी विराम |
माझिया मनी प्रीत कळेना
तिच्याशिवाय प्रेमफूल फुलेना ||

## 8. * प्रेमाचा गारवा *

प्रेमाचा तो गारवा
जणू मनी पाऊस पडावा |
चिंब वाटेल आपल्या जीवा
म्हणून वाटतो सदा हवाहवा ||
प्रेम म्हणजे असते काय हो?
मनातील भावनांचा पाऊस.. दुसरं काय हो |
प्रत्येकाने प्रेम करायचं असतं
भावनांच्या पावसात चिंब भिजायचं असतं ||
प्रेमावर आपला विश्वास असेल
स्वर्ग सुखही कमी पडेल |
खरंच जीवनमार्गच बदलेल
सुखाचा श्वास अंतरी वसेल ||
जीवनात येऊन प्रेम करावं एकदा
पण जपावं त्या प्रेमाला सदा |
प्रेम म्हणजे एक नाव असतं
जिथे बुडत्यालाही त्यागच आधार असतं ||

----------------------------------------

# 9. * प्रेम विरह *

आठवणींच्या या सागरात
पुरता मी डुबलो |
अश्रूंच्या धारेसमवेत
स्वतः मी भिजलो ||
अश्रूंना कसे थांबवू
स्वतःच नाही सावरू शकत |
आठवणींना कसे रोखू
स्वप्नांना नाही जागवू शकत ||
तिने दिलेल्या प्रत्येक क्षणाचा
ध्यास मनाने घेतला
तिच्या प्रत्येक सहवासाचा
हृदयाने आवाज जाणला ||
तिला दूर करणे म्हणजे
जीवनाशी खेळ रंगविणे |
तिच्यापासून दूर होणे म्हणजे
प्रेम विरहात स्वतःला बुडविणे ||
-------------------------------------------

## 10. * तिच्या प्रेमानं काय केलं? *

तिच्या प्रेमानं मला माणूस बनवलं
अन माणूस म्हणून भावना जपायला शिकवलं ||
तिच्या प्रेमानं मला आधार दिलं
अन आधार देऊन सावरायला शिकवलं ||
तिच्या प्रेमानं मला हास्य दिलं
स्वतः हसून दुसऱ्यालाही हसवायला शिकवलं ||
तिच्या प्रेमानं माझं मन जाणलं
स्वतःच्या मनासारखं दुसऱ्याचेही मन जाणायला शिकवलं ||
तिच्या प्रेमानं माझं श्वास राखलं
स्वतःचा श्वास रोखून दुसऱ्याच जीव सांभाळायला शिकवलं ||
तिच्या प्रेमानं माझ्या इच्छा हेरलं
स्वतःच्या इच्छेप्रमाणे दुसऱ्यांच्याही आकांक्षा पूर्ण करायला शिकवलं ||
तिच्या प्रेमानं माझं स्वप्न बहरलं
स्वतःच्या स्वप्नांसारखं इतरांचेही स्वप्न फुलवायला शिकवलं ||
तिच्या प्रेमानं माझ्या वेदना जाणलं
स्वतःच्या वेदनांवर हळूच फुंकर मारायला शिकवलं ||
तिच्या प्रेमानं माझं निस्वार्थ मन जाणलं
अन दुसऱ्यांशी निरपेक्ष मनानं जगायलाही शिकवलं ||
तिच्या प्रेमानं माझ्या हृदयातील स्पंदने जाणलं

हृदयाच्या आवाजाप्रमाणे प्रेमाचाही आवाज ऐकायला शिकवलं ||

तिच्या प्रेमानं माझ्यासाठी काय नाही केलं?
जे जे मी स्वप्नी पाहिलं....
ते ते तिनं आठवणींत चिंब भिजवल....

-----------------------------------------

## 11. * बंद आठवणी *

तिने दिलेला प्रत्येक क्षण
मी नेहमी मनात खेळवला |
अन मनाच्या कोपऱ्यात
त्या क्षणांचा आनंद अनुभवला ||
तिचा तो प्रत्येक श्वास
मी हृदयात जपलं |
अन त्या प्रत्येक श्वासावर
फक्त तिचंच नाव कोरलं ||
तिचा मिळालेला प्रत्येक सहवास
प्रेमाच्या आठवणींत बंद केलं |
अन आधाराच्या वेळी
त्या बंद आठवणींना पुन्हा जाग केलं ||
ती जवळ नसतांनाही
तिचा विचार कधी सुटला नाही |
तिच्या आठवणींशिवाय
माझा 'सूर्योदय' कधी झाला नाही ||
------------------------------------------

## 12. * प्रेम शब्द *

ओठावर आलेले शब्द
कधी फुटूच दिले नाही |
मनात दाटलेल्या भावना
कधी कुणासमोर मांडलेच नाही ||
हवी वाटत होती प्रेमाची सावली
पण प्रेमशब्द हृदयातच दाबली |
मनाची समजूत आधाराने काढली
अन प्रत्येक रात्र आठवणींनी जागविली ||
विरहाचा त्रास मनाला नाही सोसवत
तिच्याशिवाय मनात दुसरं कुणी नाही बसत ||
हृदयाच्या कोपऱ्यात एकदाच जागा भरत
रिकामी झाल्यावर आयुष्य पश्चातापात पडतं ||
आज ती माझी नाही म्हणून काय झालं
मी तर सदैव फक्त तिचाच आहे |
एकमेकांच्या हातात हात नाही म्हणून कुठे बिघडलं
आयुष्यभर तिच्या आठवणींची साथ तर आहे ||
-----------------------------------------

## 13. * प्रेमाचा निराळा खेळ *

ऊन - पावसाच्या खेळात
प्रेमाने चिंब भिजावे |
अन प्रेयसीच्या सुखापायी
प्रियकराने पार झिजावे ||
प्रेयसीचा एक सहवास
प्रियकराला नेहमी हवाहवासा |
तिच्या नकळत स्पर्शात
याचा आनंद गगनात मावेनासा ||
प्रेयसीचे मंजुळ बोलणे
जणू चांदण्यांचा वर्षाव होणे |
अन हळूच तिचे गोड हसणे
म्हणजे मनात प्रेमसुख अनुभवणे ||
तिच्या एका हट्टासाठी
हा दिवस - रात्र एक करणे |
अन त्याच हट्टापायी
ती याला एकटे टाकून निघून जाणे ||
-------------------------------------------

## 14. * जीवनफूल *

फुलांचे सौंदर्य पाहून
कुणीही प्रेम करते |
काट्यांना पाहून मात्र
कुणीतरीच जवळ घेते ||
फुलांनाच पाहिलं तर
काट्यांना अर्थ राहणार नाही |
सुखाचीच अपेक्षा केली तर
दुःखाला जागा उरणार नाही ||
फुलांना पाहून माणूसही जगतो
काट्यांप्रमाणे दुःखही पचवतो |
जीवनाचे 'सुमन' तेव्हाच बनतो
दुःखातही माणूस जेव्हा जगायला शिकतो ||
----------------------------------------

## 15. * प्रेमऋतू *

प्रेमाच्या सावलीत
गाढ झोपावे |
एकामागून एक
स्वप्ने पडतच राहावे ||
स्वप्नांच्या पावसात
चिंब भिजावे |
अन आठवणींचे थेंब
डोळ्यांत साठवावे ||
सुखाचा गार वारा
मनाला झोम्बावा |
हळूच एक झुळूक
हृदयाला येऊन भिडावा ||
प्रेमाचा हा ऋतू
जीवनात सुरूच राहावा |
प्रेमसुखाचा प्रत्येक दिवस
अखंड, अविरत जपावा ||

-----------------------------------------

# 16. * अजब मौसम *

या धुंद मौसमात
मस्तीत राहावे |
जागे असूनही सर्व
स्वप्नीच पाहावे ||
हा खेळ मौसमाचा
नेहमीच घडावा |
चिंब स्वप्नांचा
सतत पाऊस पडावा ||
मौसमाच्या गर्द छायेत
आठवणींना भुलवावे |
हृदयाच्या प्रत्येक ठोक्यात
स्वतःला विसरत जावे ||
मौसमाचे हे नाटक
अजब असले तरी
प्रत्येकाने या नाटकात
बाहूलीच बनून राहावे ||
-----------------------------------------

## 17. * हृदय तुझे *

प्रेमात पाडायला तुला
आवडत असेल तर मी
प्रेमात पडायलाही
तयार आहे |
मला जाळण्यात तुला
आनंद होत असेल तर मी
तुझ्या विरहात जळायलाही
तयार आहे |
आठवणींच्या पावसात तुला
भिजावं वाटत असेल तर मी
चिंब आठवणी द्यायलाही
तयार आहे |
हृदयातील आवाजाला तुला
जागं करु पाहायचं असेल तर मी
तो हृदय काढून द्यायलाही
तयार आहे |
-----------------------------------------

## 18. * साज प्रेमाचा *

तिच्या सौंदर्याचा घोट
मी कधीच नाही प्यायलो |
अन तिच्या साज शृंगारात
उगाच भटकत राहिलो ||
तिच्या नयनांतील तीर
माझ्या नजरेस सरळ भिडावी |
अन माझ्या हृदयाची घंटी
तिच्यासमोर आपोआप वाजावी ||
तिच्या शब्दांतील गोडवा
माझ्या कानात भरभरून साठावा |
अन त्या एकेक शब्दावर
मी उगीच विचार करीत बसावा ||
तिच्या आठवणींच्या सरी
नेहमी मनात जागवावं |
अन त्या सरींत चिंब भिजून
हृदय हलकेच शांत करावं ||

-----------------------------------------

## 19. * तू इतकं काय केलंस? *

कुणीतरी मला आपलंसं विचारलं,
"तिच्यासाठी तू इतकं काय केलंस?"
स्वतःच्या स्वप्नांचा चुराडा झाला असतांनाही
तिच्या आनंदात समाधान मानलं....
स्वतःच्या सुखाचा महाल कोसळलेला असतांनाही
तिच्या आठवणींच्या छताखाली वावरल....
स्वतःच्या इच्छा कितीही मारले गेले तरी
तिच्या आकांक्षावर जीवाला सांभाळल...
स्वतःच्या मनाला समाधान नसतांनाही तिचं मन जाणून
तिच्याच मनाप्रमाणे जगलं....
स्वतःला कसलच प्रेमसुख लाभलेलं नसतांनाही
निस्वार्थपणे तिच्यावर जीवापाड प्रेम केलं....
स्वतःच्या आयुष्यात ती कधीच परत येणार नाही हे माहिती असतांनाही
तिच्यावर स्वतःपेक्षा जास्ती जीव लावलं....
स्वतःच्या हृदयाला भिडलेल्या वेदना विसरुन
तिच्या छोट्याशा हास्यातही खळखळून हसल...
स्वतःच्या जीवनात तिच्या प्रेमसुखाची संधी समोर नसतांनाही
तिच्यावरच प्रेम तीळभरही कमी होऊ नाही दिलं....
प्रेमाच्या सुखपायी धडपडताना स्वतःची दिशा भरकटलेली असतांनाही

तिच्या आनंदी जीवनवाटेवर स्वतःला चालवलं...
कुण्यातरी परक्या सहवासात ती न्हाऊन निघत असतांनाही
तिच्या त्या समाधानात स्वतःच सुख शोधलं....
स्वतःच्या प्रेमाचा बंगला उध्वस्त झालेलं असतांनाही
तिनं दुसऱ्याबरोबर फुलविलेल्या प्रेमघरापासून स्वतःच्या सावलीलाही दूर सारलं.....

----------------------------------------

## 20. * कसं विसरु गं तुला? *

अचानक एके दिवशी
तिच्यासंगे माझी गाठभेट घडली |
तिला प्रत्यक्ष समोर पाहुनी
विचारांची माझी गतीच थांबली ||
मिळालेल्या त्या अनपेक्षित सुखाने
मी पुरता आनंदात उडालो होतो |
पण तिच्या एका सहज वाक्याने
आनंदाचा पारा पटकन उतरून जातो ||
म्हणते कशी,"का करतो रे इतकं प्रेम"
कधीच न मिळणारी मी तुला |
विसरून जा या प्रेमाला
सांभाळ आता स्वतःच्या जीवाला ||
आता कसे सांगू मी तिला
कधीच विसरलंय मी स्वतःला |
हृदय जोडलं कधीच तिच्या हृदयाला
कसं विसरणार आता त्या जीवाला? ||
पण तुझ्या शब्दाबाहेर कधी गं नाही गेलो
तुझ्या सांगण्यावर प्रेमालाही विसरायला निघालो |
आयुष्याची वाट जरी मी चुकलो
पण आयुष्य हे तुझ्याच करीता जगलो ||

## 21. * फक्त तुझाच *

प्रिये आज माझा ध्यास जरी वेगळा असे
तरी जीवनाची आस फक्त तूच असे |
तुझी साथ मिळण्याचा आजही विश्वास असे
भलेही वेड्या मनाचा हा भास असे ||
तुझ्या प्रेमात जरी न्हाऊन निघालो नसलो
तरी तुझ्या आठवणींत भिजल्याचा आनंद आहे |
तुझी साथ जरी लाभली नसली
तरी तुला हात दिल्याचा समाधान आहे ||
नसेल जरी मिळाला मला तुझा सहवास
तुझ्या परतीची नाही सोडली अजूनही आस |
तडपडत जरी असलो तुझ्या प्रेमात मुरण्यास
फक्त तुझे एकच हास्य बनेल आधार जीवनास ||
भलेही तुझ्या कोपऱ्यात माझी जागा इवलीशी असेल
पण माझ्या हृदयात 'ताजमहल' फक्त तुझाच असेल |
नशिबाने दूर केलं म्हणून काय बिघडलं
शेवटच्या श्वासापर्यंत हा जीव फक्त तुझाच असेल ||
वेळ मिळाला चुकून कधी तरी
नजर टाकशील का गं माझ्या प्रेमावरी |
जगवताहेत मला फक्त तुझ्याच आठवणींच्या सरी
कदाचित हीच माझ्या जीवनाची वाट खरी ||

## 22. * तुझ्याच करिता *

तू नाही मिळाली म्हणून
तक्रार नाही माझी नशीबाशी |
कदाचित मीच चुकलोय कुठेतरी
ही खंत सतावते सारखी मनाशी ||
प्रेम जरी जीवापाड केलो तरी
व्यक्त करण्यातच वेळ चुकली |
यातच तुझ्या बंद भावनांना घेऊन
तू जीवनात सामोरी निघून गेली ||
इतका कसा गुंतलोय तुझ्यात
ते नाहीच गं सांगू शकत |
मनाने सोसलेल्या वेदना समस्त
शब्दांनीच फक्त नाही गं मांडू शकत ||
पण तू आहे तिथे सुखीच राहा
तुझ्या संसाराची बाग फुलवायचं पाहा
माझं काय.. तडपडतोय फक्त प्रेमाकरिता |
सरलो नाही म्हणून काय झालं
उरेन आणि मरेन तर फक्त तुझ्याचकरिता ||

-----------------------------------------

## 23. * आठवण *

हृदयावरती कोरलं कधीच तुझं नाव
आता नाही मनाला कुणाचीच हाव |
हृदयातील माझ्या प्रेमाचे भाव
आजही वाटते फक्त तुलाच द्यावं ||
नाही गं विसरु शकत कधीच तुला
तुझ्याशिवाय नाही गं अर्थ मला |
घडलं जे मान्य होतं त्या नियतीला
पण फक्त तुझाच आधार हवाय या जीवाला ||
दुःखी नको होऊ कधीच माझ्या विचाराने
कसा जगत असेल मी फक्त आठवणीने |
साथ जरी सोडली असली तुझ्या हाताने
पण फक्त तुझाच आवाज जाणलंय या हृदयाने ||
भलेही माझ्यापासून दूर असशील गं
जीवनात तुझ्या सुखी असशील गं |
रोज नसेल तरी किमान कधीतरी
एकांतात माझी आठवण काढशील का गं? ||
तुझ्याच विचारांनी जगायला शिकलो
जीवनाचा गाडा चालवायला लागलो |
पण हे कदापि नको विसरु
फक्त तुझ्या मांडीवर मरण्यासाठी जिवंत राहिलो ||

## 24. * मरण हवंय तुझ्या संगे *

जीवनाच्या काटेरी वाटेवर चालताना
आता खूप थकलोय गं |
तुझ्याविना जीवन जगताना
फार एकाकी पडलोय गं ||
तुझ्या येण्याच्या प्रतीक्षेत
आजही थांबून आहे गं |
माझ्या जीवनाला सावरायला
खरंच तू परत येशील का गं ||
इतकं प्रेम करून तुझ्यावरी
कुठेतरी कमी पडलोय का गं |
जीवापाड जीव लावूनही
नशीबाने तुला दूर का नेलं गं ||
तुझ्या प्रेमासाठी धडपडताना
आता सहन होत नाही गं |
असं काय गुन्हा केलंय मी
की फक्त त्यागच पचवतोय गं ||
खरं सांगू का सखे एक
देवाकडे एकच मागतो नेहमी गं |
तुझ्या साथीने जरी जगलो नसलो तरी
मरेन तर फक्त तुझ्याच कुशीत गं ||
काही नाही मागतोय तुझ्याकडे गं

मरताना तरी साथ देशील का गं |
माझ्या हातात तुझा हात देऊन
मला मरण तुझ्या संगे देशील का गं? ||
------------------------------------------

## 25. * नको ना विसरु... *

नको ना विसरु मला कधी
आठवण तरी काढत जा कधी मधी
परत नाही मिळणार कोणतीच संधी
पण तुझ्याकरिता अजूनही नवी वाट शोधी ||
दिलं नाहीस प्रेम म्हणून
तुझ्यावरती राग माझा नाही
कधी जवळ घेतलं नाहीस म्हणून
तुझ्यावरती नाराज देखील नाही
भलेही तू सुखी असशील
पण मला कधी विसरायचं नाही
तुझ्या फुललेल्या आयुष्यात
मी कधीच काटा बनून येणार नाही ||
सहवासात तुझ्या नाही जगलो
म्हणून दुःखी जरा मी आहे
सहनच करायचा हा विरह
हे माझ्या नशिबीच आहे
तुझ्याच प्रत्येक आनंदात
माझंही समाधान शोधतो आहे
पण आजही हा जीव
फक्त तुझ्याचकरिता वेडा आहे ||
असतीलही अजून दुःख

पचवायचे मला समोर जीवनात
सगळं काही सहन करेन
हास्य ठेऊन माझ्या जीवनात
पण नाहीच कधी मागे हटणार
तुझ्याच गुंतलेल्या प्रेम स्वप्नात... ||
----------------------------------------------

## 26. * तुला काय वाटलं? *

तुला काय वाटलं
दोन शब्द रागात बोलली की
माझं प्रेम कमी होणार?
तू मला सोडली म्हणून
मी तुझ्यापासून दूर होणार?
अगं, कितीही विरह सहन केला तरी
हृदयातून माझ्या तू कधीच नाही निघणार
आजही हृदय काढून पाहिली तरी
प्रत्येक ठोक्यातून तुझंच नाव ऐकायला येणार ||
तुला काय वाटलं
तू नाही मिळाली म्हणून
जीवनात भलत्याच मार्गावर चालणार?
तू साथ नाही दिली म्हणून
आयुष्यात माझ्या मागे पडणार?
अगं, स्वतःपेक्षा जास्ती जीव तुझ्यावरी
सोबत जरी नसली कुठेच नाही कमी पडणार
आजही तुझ्या प्रेमाच्या ताकदीवरी
सगळ्यांनाच 'हास्य' वाटत जीवन जगणार ||
तुला काय वाटलं
प्रेमसुख तू नाही दिली म्हणून
विरहात मी पुरता डुबणार?

तुझ्याच आठवणींत झुरत झुरत
मनाला सारख्या वेदना देणार?
अगं, लांब तू गेली असली तरी
माझा जीव फक्त तुझ्याचजवळ असणार
आजही हवं तेव्हा आजमावून पाहा
तो फक्त तुझ्याचकरिता झुरतांना दिसून येणार ||

-----------------------------------------------

## 27. * परतशील का कधी? *

कसा जगू गं तुझ्याविना
जीव तर हा तुझ्यात गुंतलेला |
एकटा तरी किती गं चालणार
हात तुझा कधीच निसटलेला ||
विरह सहन किती गं करायचा
असतील ना भावना माझ्याही मनाला |
स्वप्न तरी किती रंगविणार
थकलोय समजावून या हृदयाला ||
कमी तर कुठे नाही ना पडलो
मग का ही तडफड माझ्याच जीवाला |
किती दिवस अजून सांभाळणार
स्वप्नात जागलेल्या प्रत्येक भावनेला ||
जीव लावण्यात कुठे चुकलोय का
तुझीच आठवण प्रत्येक रात्रीला |
सावरू शकेन माझ्या बुद्धीला
पण आवरु कसा या वेड्या जीवाला ||
खरंच नाहीच का काही किंमत
या माझ्या निस्वार्थ वेड्या प्रेमाला |
कधीतरी नकळत परतशील का
एकातरी माझ्या स्वप्नाला जागवायला ||

## 28. * तिचाच जीव *

आयुष्याच्या या खेळात
आता मात्र खंबीर झालो
कितीही संकटे आली तरी
सामोरे जायला तयार झालो |
अखेरच्या माझ्या श्वासापर्यंत
जीव फक्त तिच्यावरच लावणार
कुणीही कितीही बोललं तरी
प्रेम तर फक्त तिलाच देणार |
प्रेम केलं तर निभावणार पण
या स्वार्थी जगाला नाही भिणार
वाईट कितीही ठरवलं मला
तरी आता मागे नाही हटणार |
विश्वास हा फक्त मनालाच नव्हे
तर सदैव हृदयात जागविणार
जीव लावलाच मनातूनी
मग हा जीव सुद्धा हसत देणार |
विचारांची योग्यता मलाच ठाऊक
चिंता कुणाची नाही करणार
असेन आज, उद्या नसेनही
पण हा जीव फक्त तिचाच असणार ||

## 29. * कवी मित्रासोबत काव्यमय संभाषण *

मित्र - काय प्रेमकवी, प्रेमसागरात इतके डूबलो
मित्रांकडे चक्क कानाडोळा केलो
हातून नशीब निसटले तरी
तिच्या प्रतीक्षेत कसे काय थांबलो?
मी - प्रेम केलोय मनातूनी
म्हणून कवी मी जाहलो
सुख असो वा विरह असो
शब्दांचा खेळ मांडत निघालो
मित्र - जी गोष्ट न मिळे
त्यामागे धावणे कशाला?
शब्द तुमचे हृदयी भिडे
शंभर मिळतील सुगरणी तुम्हाला?
मी - एक चेहरा तो असा जो
शंभर सुगरणी फिके पडे
जीव ओतला एकावरी
मग स्वतःहून मागे का हटे?
मित्र - अहो या मतलबी जगी
उगाच का बनताय प्रेममुनी
विचार झटकूनी तो जुना
करा सुरुवात प्रेमाची नवी
मी - माफ करा पण प्रेमाचा हा 'खेळ' तुमचा

माझ्या मना न पटे
दुःख जरी आले माझ्या वाटे
फक्त प्रेमसुखच पाठवेन माझ्या प्रेमाकडे....
--------------------------------------------

## 30. * कवितेरुपी कविता *

कविता हेच 'जीवन'
कविता हेच 'मरण' |
कवितेशिवाय मी अपूर्ण
कवितेवरच अवलंबून 'जीवन' संपूर्ण ||
कविता हीच 'इच्छा' शेवटची
कविता हीच 'शिदोरी' जीवनाची |
कवितेशिवाय गाडी व्यर्थ आयुष्याची
कवितेविना 'जीवन' माती मोलाची ||
कविता हेच माझे मन
कविता हेच माझे धन |
कवितेमुळेच जगात मला 'मान'
कवितेशिवाय काय ती जगण्याची 'शान' ||
माझी कविता तशी तुमची कविता
जीवनाची करा सुरुवात कवितेसोबत आता |
प्रयत्न करा 'कविते'ला करण्याचा
होईल मार्ग मोकळा आयुष्याचा ||

---------------------------------------------

## 31. * जीवनाची कविता *

कविता कविता कविता
काय अन कशी करु कविता |
तुमची आमची नव्हे कविता
ही होय जीवनाची शब्द कविता ||
तुमचे आमचे मन ओळखणारी हीच कविता
विचारांची देवाण-घेवाण करणारी कविता |
संस्कृती शिकवणारी हीच कविता
ज्ञान घडवणारी देखील हीच कविता ||
कवितेविना अपूर्ण जीवनाची कविता
कवितेविना नाही येत जीवन जगता |
म्हणून निश्चय केला आता
कवितेने मिळवायची जगण्याची शान आता ||

--------------------------------------------

## 32. * जीवनाचा अर्थ *

स्वतःचे दुःख मनात दाबण्यात काय अर्थ...
स्वतःचे कुंपण सोडून इतरांना मदत करण्यात कोणता परमार्थ?
स्वतःच्या दुःखाची इतरांच्या सुखाशी सांगड घाला
अन त्यातून खऱ्या जीवनाचा अर्थ मिळवा ||
अर्थ काढताना अर्थाचा अनर्थ निघाला
तर अनर्थाचा अर्थ काढून काय फायदा?
जीवनाच्या वाटेवर 'जीवन हेच सुख' समजले
तर जीवनाचा कोणता आहे तो कायदा?
जीवनाचे ध्येय हेच जर 'समाधान'
जीवन जगण्यात तरी काय शान?
जीवनाला सुखदुःखाचा डोंगर समजलात
तरच त्या जीवनाला खरा मान !

-----------------------------------------------

* कवीचा अल्प परिचय *

नाव : प्रा. नितीन दत्तात्रय दारमोड

मूळ गाव : अतकुर ता.धर्माबाद जि. नांदेड

शिक्षण : एम.ए.(इंग्रजी), एम.ए.(इतिहास), बी.एड.

छंद : वक्तृत्व, वाचन, लेखन, भ्रमण

* इंदिरा गांधी कनिष्ठ महाविद्यालय, सिडको, नवीन नांदेड येथे इंग्रजी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत.

* विविध वर्तमानपत्रे, मासिके यातून सातत्यपूर्ण विविध सामाजिक विषयांवर परखड लेखन.

* नांदेड आकाशवाणी केंद्र 101.1 MHz हुन विविध भाषणे.

* महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक राज्यांत 350 हुन जास्ती व्याख्याने.

* कमी वयाचा प्रभावी वक्ता म्हणून गौरव.

* महाराष्ट्र राज्य युवा रत्न पुरस्कार, राज्यस्तरीय शिक्षक रत्न पुरस्कार, समाजभूषण पुरस्कार, नांदेडभूषण पुरस्कार, महाराष्ट्र गौरव पुरस्कार, आदर्श कला भूषण पुरस्कार, रमाकांत टिपणीस पुरस्कार आदी प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्त.

* अनेक राष्ट्रीय परिषदामध्ये शोधनिबंध वाचन.

* जनसेवा प्रतिष्ठाण संस्थापक अध्यक्ष म्हणून सामाजिक कार्यात आपल्या प्रतिष्ठान च्या माध्यमातून सातत्याने सामाजिक उपक्रम राबविणे.

* विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व व लेखन कौशल्याच्या विकासासाठी सतत प्रयत्नशील.

# या! या! घ्या! घ्या! घेऊन जा! लुटा! लुटून न्या!

# प्रेमाचा गारवा

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

पुस्तकांना दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.